Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - VI April 2015

# शालेय विद्यार्थ्यांत आधुनिकता दृष्टीकोन निर्माण करण्यात प्रसारमाध्यमांची भूमिका.

**प्रा. डॉ. हेमंतकुमार देवरे,**
**आर.सी. पटेल शिक्षणशास्त्र ,**
**महाविद्यालय, शिरपूर,**
**(संशोधन मार्गदर्शक)**

**प्रा. वैशाली मा. शेलार,**
**संशोधक विद्यार्थी,**
**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,**
**जळगाव.**

अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मुलभूत गरजांच्या जोडीला आता शिक्षण येऊन बसले आहे. प्राचीन काळी शिक्षण हे उच्चवर्णियांसाठी होते. तर मध्ययुगात सरंजमाशाहीत शिक्षण हे अमीर, उमराव, सरदार या राजशाहीतील अधिकारी वर्गासाठी होते. पण आधुनिक लोकशाहीच्या युगात शिक्षण हे सार्वजनिक झाले आहे. शिक्षण ही केवळ व्यक्तीचीच गरज नाही तर समाजाची व राष्ट्राचीही गरज आहे. आधुनिक शिक्षणाचे ध्येय मुलांचा सर्वांगीण विकास आहे. प्रत्येक मुलाच्या अंगी असणा-या कार्यशक्तीचा वापर करुन त्यांचा सर्वांगीण विकास साधता येणे गरजेचे आहे. शिक्षणपध्दतीत बालक केंद्रस्थानी आहे. शिक्षणामुळे सामाजिक बदल घडून येतात म्हणून असे म्हटले जाते की शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे. आधुनिकीकरण म्हणजे सामाजिक व्यवहारात बुध्दिवादी दृष्टीकोन व उदार दृष्टी आणि तसेच भौतिक प्रगती, साधने व तिचा जीवनात उपयोग करणे होय. आधुनिकीकरण म्हणजे शास्त्रीय व तांत्रिक युगात पदार्पण करणे होय. हे सुलभ करण्यासाठी शिक्षणाची मदत होते. राष्ट्राची शास्त्रीय व तांत्रिक प्रगती व्हायची असेल तर लोकांना योग्य त-हेने शिक्षण मिळावयास हवे व्यक्तीस स्वत:च्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव, सामाजिक बांधिलकी, कार्यकौशल्य, व्यवस्थापन कुशलता, समाजप्रगतीसाठी समर्पित सेवा या गोष्टी शिक्षणाशिवाय साध्य होणार नाहीत. शिसक्षणप्रसारासाठी व निरक्षरता निर्मुलनासाठी प्रसार माध्यमे महत्त्वाची भूमिका निभावत आहे.

आधुनिकीकरण म्हणजे केवळ भौतिक प्रगती किंवा नवे विज्ञान नव्हे तर, सामाजिक, नैतिक मूल्यांचे जतन अभिप्रेत आहे. शिक्षणाने नव्या काळाला उद्देशून जीवनमूल्ये निर्माण केली पाहिजेत. पाश्चात्य देशातील शिक्षणाचे किंवा जीवनपध्दतीचे केवळ अनुकरण करून भागणार नाही तर आपल्या नैसर्गिक व मानवी संपत्तीचा विकास शिक्षणाने करुन सुधारलेल्या राष्ट्रात भारताची गणना व्हावयाय पाहिजे. पारंपारिक समाजव्यवस्था आणि गतकालीन जीवनमूल्यांपासून आधुनिकीकरणाने सुटका करून घेतली पाहीजे. गतकालीन मूल्ये जर आधुनिक काळात इष्ट असतील तर ती जरूर टिकावीत महणून शिक्षणाने संस्कृतीच्या उत्कृष्ट शिशेषांचे जतन केले पाहिजे. शिक्षणाने नवी पिढी घडविण्याची जबाबदारी शिक्षकाला टाळता येणार नाही. नविन विचारांची नविन आकाराची उगवती पिढी तयार झाली म्हणजे मग लोकशाही निष्ठ समाजाचा पाया भरभक्कम होईल.

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - VI April 2015

भारतात समाजपरिर्वतन ही फार मोठी समस्या आहे ती सोडविण्यासाठी जबाबदारी शिक्षणाची आहे म्हणून शिक्षण हे समाजकेंद्रित झाले पाहिजे. आजच्या शास्त्रीय व तांत्रिक युगा ंमध्ये अनौपचारिक समाजीकरणाची कार्यवाही ती म्हणजे प्रसार माध्यमे होत. ही साधने केवळ मनोरंजन करतात असे नव्हे तर निरनिराळ्या विषयासंबंधी माहिती देतात व ज्ञानाच्या कक्षा दिवसेंदिवस कशा विस्तारत आहेत याचीही कल्पना पुरवतात या साधनांमुळे एकाच वेळी अनेक व्यक्तींशी संपर्क साधता येतो मग त्या व्यक्ती जगाच्या पाठीवर कुठेही असोत. प्रसार माध्यमांना समाज शिक्षणात फार मोठे महत्त्व आहे. निरक्षरांना सुध्दा जगातील घटनांचे ज्ञान सुलभ रितीने व मनोरंजक रितीने होते. बालक, युवक, स्त्री-पुरुष, कामकरी, शेतकरी, कलावंत , उद्योजक या सर्वांना एकाच वेळी एकाच केंद्रावरुन दुरवरच्या अंतरावरील घडामोडींची, व्यक्तींची, सामान्यांची , नैसर्गिक माहिती मिळू शकते. या विविध साधनांचा शिक्षणात देखील उपयोग होतो. ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, मनोरंजन, चर्चा, कलाविलास , वर्णने इत्यादींनी श्रोत्यांच्या व प्रेक्षकांच्या मनावर प्रभाव पडतो. हा प्रसार माध्यमांचा मोठा फायदा आहे. तसेच यामुळे पैसा व वेळ यांची देखील बचत होते.

या प्रसार माध्यमात मुद्रित साहित्य, चलचित्रपट, आकाशवाणी, चित्रवाणी यांचा समावेश होतो. मुद्रित साहित्यात (The Press) वृत्तपत्रे, नियतकालिके, पुस्तके, पुस्तिका, प्रवेशिका, शोधनिबंध समाविष्ट होतात.

### 1) **वृत्तपत्रे :-**

वृत्तपत्रे हे सुसंस्कृत माणसाचे व लोकशिक्षणाचे महत्त्वाचे संपर्क साधन आहे. जगातील विविध देशात व विविध देशात व विविध भाषात नाना विविध प्रकारची वृत्तपत्रे निघतात. वृत्तपत्रामुळे जगातील हरघडी घडणा-या घटनांची माहिती अल्पकाळात जगातील कालाकोप-यापर्यंत जाऊन पोहोचते. वृत्तपत्रांचा समाजमनावर फार मोठा परिणाम होतो. वृत्तपत्र वाचनाने माणसाची मते बनतात, त्यांच्या ज्ञानाचा विकास होतो व त्यांचा चौकसपणा वाढतो. वृत्तपत्रामुळे वाचकांचे मनोरंजन होऊन ज्ञान संवर्धन होते. वृत्तपत्रात जाहिरात केल्याने कारखानदारांच्या मालाला उठाव मिळतो. नाटक, सिनेमा, संगीत कार्यक्रम याचा तर जाहिरातीमुळे वृत्तपत्रांशी दररोज संबंध येतो. समाजात कोणतीही चळवळ असो उदा. राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, कृषीविषयक, कलात्मक, ज्योतिष, क्रिडा, सामने इत्यादी समाजाच्या प्रत्येक पैलूची माहिती वृत्तापत्रामुळे होते. वृत्तपत्रे हे प्रचाराचे एक अमोघ साधन आहे.

आजच्या जागतिकीकरणाच्या आधुनिक युगात वृत्तपत्राचे स्वरुप बदलेले आहे. सर्व वयाच्या व्यक्तीचा विचार करुन संपूर्ण आठवडयात विविध विषयाच्या, विविध पुरवण्यांच्या समावेश त्यात असतो.

न्युयॉर्क टाईम्स या जगातील आघाडीच्या वृत्तपत्राने आठ महिन्यापूर्वी कदाचित पुढील एक दोन वर्षात आम्ही मुद्रीत आवृत्ती रद्द करु अशी घोषणा केल्यापासून जागतील सर्वच दैनिकांनी आपली धोरणे निराळ्या दिशेने आखायला आरंभ केला आहे. याचा अर्थ जगातील मुद्रित वृत्तपत्रे बंद पडतील असा आहे. पण माहिती तंत्रज्ञानाचे युग सुरु झाल्यापासून वृत्तपत्रांना दररोज या तंत्रज्ञानातील नव्या घटनांचा वेध घ्यावा लागत आहे व बदलाला तयार व्हावे

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - VI April 2015

लागत आहे. भारतीय लोकजीवनात वृत्तपत्रांना आदराचे स्थान आहे. माहितीच्या प्रचंड महासागरातून त्या त्या दिवसांच्या घटकांच्या आधारे प्रत्येक व्यक्तीला लागणा-या बाबी देणे हे नव्या पत्रकारितेचे उद्दिष्ट दिसत आहे. कामगार, गृहिणी, करीअर करणा-या महिला, शेतकरी निरनिराळ्या विषयाचे व पातळीचे विद्यार्थी निरनिराळे व्यावसायिक, व्यापारी या प्रत्येकाला तयाचे दैनिक ठरविण्याचा व ते उपलब्ध करण्याचा पर्याय असणार आहे. जगातील आणि भारतातील तीन चार दैनिकातून मी माझे दैनिक तयार करू शकतो व दररोज मी माझ्या वृत्तपत्राच्या वेळी तेवढेच उपलब्ध करु शकतो. असा पर्याय आता येऊ लागला आहे. माहिती तंत्रज्ञानातील ही घोडदौड पाहिली की वाटू लागते, आपण कोणत्या गाडीने जाणार आहोत ही गाडी कोठे जाणार हे ही माहिती नाही.

## 2) पुस्तके :-

प्राचीन काळापासून प्रसारमाध्यमांनी भूमिका पुस्तकांनी निभावली आहे. थोरांसाठी जसे वाङ्मय निर्माण होते. तसेच बालकांसाठीही वाङ्मय निर्माण होते. त्यात रामायण, महाभारत, ऐतिहासिक कथा व आख्यायिका, इसापनीती, हितोपदेश पंचतंत्र इत्यादीतील गोष्टीचा समावेश असतो आणि मुलांना त्या फार आवडतात. विशेषत: हास्योत्पादक (कॉमिक्स) गोष्टीवर त्यांच्या उडया पडतात. त्याशिवाय बालकांसाठी चित्रात्मक कथाही आकर्षक रितीने छापल्या जातात. त्याही मुले आवडीने वाचतात. आणखी प्राचीन व अर्वाचीन आश्चर्य, शोध कथा, प्रवासवर्णने, शास्त्र कल्पित कथा (Scientific fiction) याही मुलांच्यासाठी मुद्रित केल्या जातात. मुलांना वाचनाची गोडी लागून त्यांची सद्भिरुची विकसित व्हावी म्हणून आनंद, खेळगडी, मुलांचे मासिक, किशोर छावा, या मासिकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. आजच्या बालवाङ्मयात भा.रा.भागवत, रत्नाकर मतकरी, साने गुरुजी, रमेश महाले या लेखकांनी लक्षणीय भर घातली आहे.

बालकांचे शैक्षणिक विश्व समृद्ध व अनुभव सिध्द करण्यात पुस्तकांची महत्वाची भुमिका आहे. नेहमी असे म्हटले जाते. “वाचाल तर वाचाल” म्हणून दर्जेदार पुस्तकांची निर्मिती करुन बालकांत वैज्ञानिक दृष्टीकोन, तांत्रिक कौशल्ये, सर्जनशीलता, नैतिक मूल्ये, चारित्र्य संपन्नता रुजविणे गरजेचे आहे. बालकांसाठी पुस्तकांची निर्मिती करतांना त्यांच्या आवडीनिवडी लक्षात घेण्याबरोबरच आधुनिक काळातील सामाजिक मूल्ये त्यातून रुजविली जावीत. आजच्या संगणक युगात ऑनलाईन पुस्तके मोठया प्रमाणावर उपलब्ध आहेत. इंटरनेटवरील gangabook.com या वेबसाईटवर दर्जेदार पुस्तके मोफत उपलब्ध आहेत. त्यामुळे बालकांचे मनोरंजन होण्याबरोबरच त्यांच्या ज्ञानात भर पडण्यास मदत होते.

## 3) आकाशवाणी (रेडीओ):-

एकेकाळी ज्याचा ख-या अर्थाने समाजात प्रभावच होता ते साधन म्हणजे ट्रान्झिस्टर होय. रेडीओ हे अतिदुर्गम ठिकाणी जाऊन पोहोचलेले साधन आहे. आकाशवाणीवर प्रामुख्याने बातम्या, गाणी, संवाद, व्याख्याने श्रृतीका, महिला, शेतकरी व कामगारांसाठी उपक्रम म्हणजे रेडीओ हे उपयुक्त असे शैक्षणिक प्रसाराचे साधन आहे. शैक्षणिक

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - VI April 2015

दृष्टीकोनातूनच शैक्षणिक प्रसाराचे साधन आहे. शैक्षणिक साधनातून शैक्षणिक पाठही घेतले जातात. गाणे, व्याख्याने, श्रुतिका, प्रौढशिक्षण, सिनेसंगीत, बालोद्यान, विज्ञान श्रुतिका, युवा वाणी, भक्तीगीते इत्यादी उपक्रमे लोक ऐकतात. आकाशवाणीतून ज्ञान, समृध्दी, माहितीचे प्रसारण, संस्कार, करमणूक या विषयी उपयुक्त साधन आहे. आकाशवाणी हे लोकशिक्षणाने तसेच शालेय शिक्षणाचे काम करणारे साधन आहे. बालकांसाठी बालविहीर, शिशु विहार, आकाशवाणी पाठाचे आयोजन, मनोरंजन उपक्रम, शालेय व्याख्याने इत्यादी आधुनिक स्वरुपाचे उपयुक्त उपक्रम सादर केले जातात. आणि या उपक्रमातून आजच्या विद्यार्थ्यांत आधुनिक दृष्टीकोन निर्माण होण्यास मदत होते.

जागतिकीकरणाच्या युगात इतर प्रसारमाध्यमांमुळे महत्व कमी झालेले असले तरी आजही दुर्गम व ग्रामीण भागात रेडीओलाच प्राधान्य दिले जाते. आधुनिकीकरणाच्या या युगात रेडीओने देखील आपले स्वरुप बदलेले आहे. ठराविक दिवशी, ठराविक वेळेस विशिष्ट वयोगटातील व्यक्तींसाठी कार्यउपलब्ध केले जातात. तसेच रेडीओ वरील कार्यक्रम सांगण्यासाठी रेडीओ जॉकी ही नवी संकल्पना उदयास आली आहे. रेडीओ जॉकीचे वैशिष्टय हे की ते आपल्या खुमासदार भाषा कौशल्याने कार्यक्रमाची रंगत वाढवितात.

### 4) **<u>चित्रवाणी (दुरदर्शन) :-</u>**

चित्रवाणी हे दृकश्राव्य साधन आहे. (आवाजाबरोबर चित्रही पाहता येते.) दृश्य व ध्वनी हे दोहांचे वहन चित्रवाणी एकाच वेळी करते. भारतात जवळपास 500 च्या वर चॅनल निर्माण होऊन वेगवेगळ्या स्वरुपाची माहिती दूरदर्शनव्दारे मिळू लागलेली आहे. दूरदर्शनच्या माध्यमातून व्याख्याने, चित्रपट, गाणी, क्रिकेट, हॉकी, टेनिस वेगवेगळ्या शर्यतीचे दर्शन होते. सांस्कृतिक उपक्रम, जुन्या-नव्या बोलपटाचे पुर्न:प्रक्षेपण, नाटके, मनोरंजनाचे उपक्रम, भौगोलिक, सामाजिक, राजकिय संवाद, वैज्ञानिक, संगणक उपक्रम, विविध प्रश्न मंजूषा, किलबिल, आमची माती आमची माणसे, ज्ञानदिप इत्यादीसारखे कार्यक्रमातून समाज प्रबोधन केले जाते. समाज शिक्षणाचे व शालेय शिक्षणाचे विविध उपक्रम दूरदर्शनव्दारे प्रसारीत केले जातात. शैक्षणिक दृष्टीने अध्यापनाची सर्वसाधारण गुणवत्ता वाढविणे, वर्गातील कंटाळवाणे व तेच तेच वातावरण दूर करुन त्यात नाविण्य व विविधता आणणे, विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन चिकित्सक करणे या गोष्टी टी. व्ही. मुळे साध्य होऊ शकतात. तरुण पिढीला सामाजिक व सांस्कृतिक वारसाचा टी.व्ही. परिचय करुन देतो या दृष्टीने हे महत्वाचे प्रसार माध्यम आहे.

आज स्पर्धेच्या युगात दूरदर्शनने आपले नवे रुप धारण केले आहे. सद्यस्थितीत सामाजिक परिवर्तन घडवून आणण्या ाठी दूरदर्शनचा मोठया प्रमाणावर उपयोग करण्यात येत आहे. आज ग्रामीण भागात देखील दूरदर्शन घराघरात पोहोचले आहे. तज्ज्ञ शिक्षकांचे पाठ दूरदर्शनव्दारे एकाच वेळी प्रकाशित करण्यात येत आहेत. तसेच विज्ञानातील शोध, विविध कलांचा अविष्कार, पर्यटन स्थळांची माहिती, प्रसिध्द व्यक्तीमत्वाच्या मुलाखती दाखविण्यात येत आहेत. म्हणून दूरदर्शन हे ज्ञान शिक्षणाचे महत्वाचे माध्यम आहे.

### 5) **<u>चित्रपट (सिनेमा) :-</u>**

लहानांपासून थोरापर्यंत सर्वांना आकर्षित करणारे साधन म्हणजे सिनेमा होय. चित्रपट कलाकरांना बघण्याचे मोठे आकर्षण समाजाला असते. चित्रपट हे दृकश्राव्य साधन आहे. या साधनातून प्रभावी संस्कार करण्याचे सामर्थ्य आहे. चित्रपटाचा प्रभाव लहान मुलांपासून ते वृध्दापर्यंत पोहोचला आहे. चित्रपटातील फॅशन, वेशभूषाख केशरचना, स्टाईल यांचा मोठा परिणाम समाजावर पडलेला आहे. तसेच चित्रपट हे केवळ देशापूरते मर्यादित राहिलेला नाही भारतात अनेक विदेशी चित्रपट दाखविले जात आहेत. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा नविन अविष्कार लोकांना बघावयास मिळत आहे. नवनवीन वैज्ञानिक शोध, अद्‌भूत आश्चर्य याची माहिती होत आहे. देशापूरती भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक दृश्यांची मर्यादा राहिलेली नाही. संपूर्ण जगाचे दर्शन आज घडत आहे. त्यामुळे पारंपारिक चित्रपटाच्या मर्यादेतून बाहेर पडून चित्रपटाने आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात नवी झेप घेतली आहे. यात ॲनिमेशन, 3D सारख्या परिवर्तन घडवून आणण्यास मदत करीत आहे. सद्यस्थितीत शैक्षणिक चित्रपट निर्माण होण्याचे प्रमाण मोठे आहे. त्यामुळे सद्यस्थितीतील शिक्षणाचे स्वरुप समजण्यास मोठी मदत झाली आहे.

आधुनिकीकरणाच्या युगात चित्रपटातील आधुनिक क्रांतीने शिखर गाठले आहे. या माध्यमातून पारंपारिक अंधश्रद्धा, अनिष्ठ चालीरिती नाहीसे करुन लोकांत वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्याचे महत्याचे कार्य करीत आहे. श्यामची आई, संत तुकाराम, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर यासारख्या चित्रपटांनी पूर्वी लोकांच्या मनावर अधिराज्य गाजविले होते. यातून लोकांना संताचे चारित्र्य माहित होण्याबरोबरच संतांनी अनिष्ट, रुढी, परंपरा व अंधश्रध्दा या विरोधात केलेले कार्य माहिती होऊन समाज प्रबोधन केले गेले. आज श्वास, फॅंड्री, तारे जमी तर, दहावी फ, बालक पालक, निशाणी डावा अंगठा या चित्रपटांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच समाज परिवर्तनात महत्त्वाची भूमिका बजावली.

6) **<u>संगणक :-</u>**

संगणक हा आजच्या स्पर्धात्मक युगातील परवलीचा शब्द आहे. आधुनिक काळात माहितीचे स्त्रोत पुरविणारे साधन म्हणजे संगणक होय. शोध व तंत्रज्ञानाच्या प्रस्फोटामुळे, ज्ञानाचे विशिष्टकरणामुळे विविध ज्ञान, शाखा उदयास आल्या आहेत. त्या प्रत्येक शाखेचे बारकावे, सखोलता, चिकित्या, विश्लेषण, अर्थनिर्वचन, संगणकाद्वारे करता येते. अनेक मानवी शक्तीचा वापर कमी होऊन बौध्दीक माहितीखे् ज्ञानइंद्रिय म्हणून संगणकाकडे पाहिले जाते. संगणकात, विज्ञान, रसायन, भौतिक, जीव प्राणी, भूगोल, इतिहास, गणित, भाषा, वनस्पती, शरीर आरोग्य इत्यादी ज्ञान शाखांच्या माहिती स्त्रोत संगणकात आहे. सर्व विषयाच्या माहितीचे आधुनिकिकरणाने माध्यम वा साधने महणजे संगणक होय. माहितीला त्याद्वारे प्रचंड गती प्राप्त झाली आहे. इंटरनेट क्रांतीमुळे संपूर्ण जग जवळ आले आहे. मार्शल मॅक्कलूहान यांनी म्हटल्याप्रमाणे ख-या अर्थाने (World is Village) जग हे खेडे आहे या संकल्पनेला संगणकामुळे अर्थ प्राप्त झाला आहे.

आज सर्वच शाळांमधून संगणक उपलब्ध आहेत. शालेय विद्यार्थ्यांना संगणक हा विषय सक्तीचा केला गेला

आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांत संगणकाविषयी जनजागृती होण्यास मदत झाली आहे. शालेय स्तरावरच संगणक हाताळण्याचे कौशल्य या विद्यार्थ्यांना प्राप्त होत आहे. त्यामुळे आपल्या देशातील संस्कृतीची माहिती होण्याबरोबरच त्यांना इतर देशातील संस्कृती, मूल्ये यांची देवाण घेवाण करता येत आहे. जागतिक स्तरावरील मिळणा-या माहितीच्या खजिन्यामुळे या मुलांचा आधुनिक दृष्टीकोन विकसित होण्यास मदत होत आहे. त्यामुळे आपल्या देशातील अंधश्रध्दा रुढी-परंपरा यांचा समाजावर असलेला पगडा काही प्रमाणात का होईना कमी होण्यास मदत झाली मदत झाली. तसेच मुलींचे शिक्षण, विवाह पध्दती, पडदा पध्दती, स्त्री-पुरुष समानता, लैंगिक शिक्षण, कुटूंब शिक्षण या सर्व घटकात आहे. संगणकामुळे परिवर्तन घडून येण्यास मदत होत आहे म्हणून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात संगणकाचा महत्त्वाचा वाटा आहे.

## 7) **मोबाईल :-**

मानवाच्या नाक, कान, डोळे, जीभ या पाच इंदियांच्या बरोबरीने आता एक सहावे इंद्रिय अस्तित्त्वात आले आहे, आणि ते म्हणजे मोबाईल होय. मोबाईलच्या अनेक अंगांनी होणारा विकास पाहता तो आता केवळ बोलण्यापुरता मर्यादीत राहीलेला नाही. मोबाईलची अनेक वैशिष्टये आहेत. यात गतिमान इंटरनेट, टेलीव्हिजन, व्हीडीओ, कॉन्फरसिंगची सोय, चित्रपट, संगीत, साहितय इत्यादींचा समावेश आहे. घरी बसून मोबाईलवरुनच वस्तूंची देवाण-घेवाण होत असते. शिक्षण क्षेत्रात देखील मोबाईल एज्युकेशन ही संकल्पना रुढ झाली आहे. मोबाईलचा वापर करुन विद्यार्थ्यांना दृक श्राव्य या दोन्ही माध्यमार्फत ज्ञानाचे भांडार खुले झाले आहे. मोबाईल आवश्यक त्या ठिकाणी नेता येते. त्यामुळे व्यक्ती बसल्याजागी आपली कामे पूर्ण करु शकतात. म्हणून मोबाईलला अनन्य साधारण महत्त्व आहे. मोबाईल क्षेत्रात 3G, 4G या तंत्रज्ञानाचा समावेश झाला आहे. 3G तंत्रज्ञानयुक्त मोबाईल्स मुळ, टेक्स्ट, न्युजरिक्स, ऑडीओ या बरोबरीनेच ग्राफिक्सचेही आदान प्रदान जलद गतीने करणे शय झाले आहे. तसेच शैक्षणिक संशोधन क्षेत्रातील मुलाखत तंत्राचा वापर केला जातो. 3G मोबाईल तंत्रज्ञानामुळे दूर मुलाखत (Tele Interview) असा प्रकार रुढ होण्यास मदत झाली आहे. शालेय विद्यार्थ्यांना मोबाईल हाताळावयास दिल्यास ते शिक्षणासाठी त्याचा चांगला उपयोग करु शकतील. शालेय विद्यायांच्या विषयाबाबत असलेली माहिती, अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना वाटणारे कठिण शब्दार्थ, तज्ज्ञ शिक्षकांशी संवाद, व्यावसायिक शिक्षणाबद्दल माहिती, शिक्षण क्षोतील नविन प्रवाह शिक्षणातील आधुनिक अध्यापन पध्दती या सर्वच घटकात मोबाईलमुळे परिवर्तन घडून येत आहे.

## 8) **वाहिन्या :-**

भारतात 1995 पासून मोठया प्रमाणावर वाहिन्यांचे प्रसारण सुरु झाले. या वाहिन्यांनी अनेक मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर करण्याबरोबरच समाजाचे प्रबोधन घडवून आणण्याचा चंगच बांधला. यात अनेक सामाजिक समस्यांवर मोठया प्रमाणावर भाष्य केले गेले. तसेच या समस्यांचे सर्वच पैलू वाहिन्यांच्या माध्यमातून समाजातील

Impact Factor : 1.021 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – III, Issue - VI April 2015

लोकांपुढे मांडले गेले. वाहिन्यांमध्ये प्रामुख्याने ई-टिव्ही, झी-मराठी, झी-सिनेमा, कलर्स, सोनी, यु-टीव्ही यांनी समाजात मानाचे स्थान प्राप्त केले. या सर्व वाहिन्यांवर शैक्षणिक, व्यावसायिक, कौटूंबिक रचनेवर आधारित अशा सर्वच प्रकारांचे कार्यक्रम दाखविले जातात. तसेच काही वाहिन्या केवळ बातम्या प्रसारीत करण्याचे काम करतात या प्रामुख्याने आजतक, आय.बी.एन, लोकमत, सी न्यूज या वाहिन्यांवरुन मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषातून बातम्या प्रकाशित केल्या जातात. या बातम्या चोवीस तास प्रसारीत होतात. त्यामुळे जगाच्या कानाकोप-यात घडणा-या घटना त्वरीत आपल्यापर्यंत पोहोचतात. तसेच ज्या दृश्य स्वरुपात असल्यामुळे परिणामकारक ठरतात. आज वाहिन्यांनी प्रत्येक घरा-घरांत माणसाच्या मनावर अधिराज्य गाजविण्यास सुरुवात केली आहे. तसेच या वाहिन्यात दररोज नवनवीन वाहिन्यांची भर पडत आहे. आता या वाहिन्यात विशिष्ट कार्यक्रमाच्या विशेष वाहिन्या अस्तित्वात आल्या आहेत. स्टार स्पोर्टस, ही वाहिनी दिवसभर खेळ व त्यांची माहिती प्रसारित करतात.

पाककला, साहित्य, संगीत, इतिहास, हवामान, संस्कृती, पर्यटन, वन्यजीवशास्त्र, प्राणीशास्त्र या सर्व घटकांची माहिती विविध वाहिन्यांवरुन प्रसारीत होते. तसेच या कार्यक्रमांच्या विशिष्ट वाहिन्या देखील उपलब्ध आहेत. या वाहिन्यावरील माहिती ही विविध राज्यातील त्या त्या प्रादेशिक भाषांमध्ये प्रसारीत होते. त्यामुळे राज्याराज्यात सांस्कृतिक देवाण-घेवाण होण्यास मदत होते. आपली संस्कृती समृध्द होण्यास व तिचा विकास होण्यास त्यामुळे मदत होते. तसेच या वाहिन्यांवर विनोदी कार्यक्रमही मोठया प्रमाणावर प्रसारीत केले जातात. म्हणजेच आजच्या या आधुनिक युगात मनोरंजन, ज्ञान- विज्ञान शिक्षण या सर्वच घटकांची माहिती घरबसल्या वाहिन्यांमुळे आपणास प्राप्त होत आहे.

प्रत्येक राष्ट्रात सतत काहीना काही परिवर्तन होत असते. परिवर्तन आपण कधीही थांबवू शकत नाही. नेहमी असे म्हटले जाते की, Everything is change but change is not change. व्यक्तीत व समाज परिवर्तन हा एक अविभाज्य भाग आहे. समाजात आधुनिकता आणण्याचे सारे श्रेय प्रसार माध्यमांना जाते. आधुनिक दृष्टीकोन निर्माण करणे म्हणजे विशिष्ट दिशेने झालेले आंतरिक परिवर्तन होय. समाजाचा मुख्य घटक असलेल्या व्यक्तींचा विकास होण्यासाठी प्रसार माध्यमे महत्त्वाची ठरतात. आधुनिक दृष्टीकोन निर्माण करणे म्हणजे विशिष्ट दिशेने झालेले आंतरिक परिवर्तन होय. आधुनिक विचार, आचार, स्वातंत्र्य, तंत्रज्ञान, आधुनिक माहिती स्त्रोतानूसार, व्यवस्थापन, स्वयंचलन समाज व व्यक्ती व्यक्तीमधील संबंधात वाढ यांचा स्विकार करणे म्हणजे आधुनिकीकरण होय आणि हा दृष्टीकोन शालेय विद्यार्थ्यांत निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमे उपयुक्त ठरतात. आज शाळेत शिकणारे विद्यार्थी उद्याचे सुजाण नागरीक आहेत म्हणून समाजाचा पाया असलेल्या विद्यार्थ्यांत आधुनिकतेबाबत जनजागृती होण्यासाठी प्रसारमाध्यमे उपयुक्त ठरतात. शालेय विद्यार्थ्यांत आधुनिक दृष्टीकोन निर्माण केल्यामुळे प्राचीन संस्कृतीतील विधायक मूल्य व ध्येये यांची नविन मुल्यांशी सांगड घालणे शक्य झाले आहे. प्रसार माध्यमांचा वापराने समाजातील कर्मकांड, अंधश्रध्दा, व्रतवैकल्ये, जुनाट परंपरा व रुढी यांचे समाजावरील जोखंड कम होण्यास मदत

झाली आहे.

ब्रिटीश राज्यसत्तेमुळे भारतात आधुनिकीकरणास प्रारंभ झाला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या प्रक्रियेस जोर चढला व सध्याच्या उदारीकरण व जागतिकीकरणाच्या वातावरणामुळे आधुनिकीकरणास प्रचंड वेग प्राप्त झाला आहे.

मार्शल मॅकलुहान हे संप्रेषणातील कॅनेडीयन विव्दान होते. प्रसार माध्यमांच्या सांस्कृतिक अन्वयार्थावर त्यांनी काम केले. त्यांच्या विचाराचे प्रमुख सूत्र म्हणजे नवीन प्रसारमाध्यमे, नविन तंत्रज्ञान हे आपल्या शरीराचे विस्तारीत रूप आहे. त्यामुळे नविन घाट तयार होतात. आधुनिक युगातील मनुष्य कानापेक्षा डोळ्यांनी जगतो. यावर मार्शल मॅकलूहान यांचा ठाम विश्वास होता. आणि म्हणूनच त्यांनी जग हे खेडगांव आहे व माध्यम हाच संदेश हे जगाला सांगितले. आजच्या शालेय शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणावर होतो आहे. आधुनिक तंत्रविज्ञानामुळे प्रसार माध्यमांचा उपयोग मोठया प्रमाणात होतो. रेडीओ, दूरदर्शन, संगणक या प्रसारमाध्यमांचा उपयोग करून विद्यार्थ्यांना नविन आधुनिक अध्यापन पध्दती व तंत्राचा वापर परिचय करुन दिला जात आहे. यामुळे मार्शल मफकलूहान यांनी म्हटल्याप्रमाणे हे विद्यार्थी ख-या अर्थाने नविन कानापेक्षा डोळ्याने जगातील म्हणून उद्याचा नागरीक अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा घडवायचा असेल तर शालेय शिक्षणात प्रसार माध्यमांशिवाय तरणोपाय नाही.

**संदर्भसुची :-**

1) पारसनीस, न.रा., (1987), शिक्षणाची तात्ीक व समाजशास्त्रीय भूमिका पुणे : नूतन प्रकाशन
2) पवार, ना.गो.(1991), उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षणतज्ज्ञ पुणे : नूतन प्रकाशन
3) कुंडले, म.बा.(1971), शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र पुणे: श्री विद्या प्रकाशन
4) जाधव, के.के. (ऑक्टो.2008), नविन काळाचे शिक्षण-समाजशास्त्र नाशिक:मन प्रकाशन
5) वीरकर प्रभाकर व वीरकर प्रतिभा, उदयोन्मुख भारतीय समाताचे शिक्षण व शिक्षक पुणे:पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
6) दुनाखे अरविंद व देशपांडे लिना, (सप्टें. 2009) प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे : नित्य नूतन प्रकाशन

.